

# मेट्रो ३ चे स्थानक तयार; आता सरकत्या जिन्याची चाचणी

**मुंबई :** कुलाबा वांद्रे सिप्झ मेट्रो ३ या प्रकल्पाने आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. या मार्गावरील सिद्धिविनायक स्थानकातआज सरकता जिना बसवण्यात आला. या जिन्याची चाचणी घेतली जात आहे. मेट्रो ३ प्रकल्पाच्या भुयारीकरणाचे ९० टक्क्यांपेक्षा जास्त काम झाले आहे. स्थानक उभारणीची कामेही सुरू आहेत. स्थानकांवर आवश्यक त्या पायाभूत सुविधा उभारण्याची कामे प्रगतीपथावर आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सिद्धिविनायक स्थानकात पहिला सरकता जिना बसवण्यात आला. मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजितसिंह देओल यांच्या हस्ते या सरकत्या जिन्याचे उद्घाटन करण्यात आले. अवघ्या १८ दिवसांत हे काम पूर्ण झाले. पुढील काही दिवस या जिन्याची चाचणी घेण्यात येईल.दर तासाला सात हजार प्रवासी या सरकत्या जिन्याचा वापर करू शकतील.